**ठळक बातम्या**

- यंदाच्या खरीप हंगामासाठी १४ पीकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- सोनं आणि चांदीवरचं आयात शुल्क ६ वरुन १५ टक्के करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय, सोन्याचांदीच्या किंमतीत वाढ

- काटकसरीसाठी प्रधानमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या ताफ्यातल्या वाहनांच्या संख्येत घट

- पुद्दुचेरीत ऑल इंडिया एनआर काँग्रेस नेते एन. रंगासामी यांनी आज पाचव्यांदा घेतली मुख्यमंत्री पदाची शपथ

**आणि**

- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चीन दौऱ्यावर

**<><><><><><>**

यंदाच्या खरीप हंगामासाठी १४ पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करायला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. ऐकुया याविषयीचा सविस्तर वृत्तांत...

***होल्ड.. कॅप्सुल***

*(यंदाच्या खरीप हंगामात ८२४ लाख मेट्रिक टनांपेक्षा जास्त पिकांची खरेदी किमान हमी दरानं करण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट आहे. यातून शेतकऱ्यांना दोन लाख ६० हजार कोटी रुपये मिळतील, असं माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवीदिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं.*

*तांदळासाठी यंदा प्रति क्विंटल २ हजार ४४१ ते २ हजार ४६१ रुपये एमएसपी मिळेल. ज्वारीसाठी ४ हजार २३ ते ४ हजार ७३ रुपये दर मिळेल. बाजरीसाठी २ हजार ९००, नाचणीसाठी ५ हजार २०५ रुपये प्रतिक्विंटल दर मिळेल. कडधान्यात तुरीसाठी ८ हजार ४५०, मुगासाठी ८ हजार ७८०, उडदासाठी ८ हजार २०० रुपये प्रतिक्विंटल दर असेल. कपाशीसाठी हा दर ८ हजार २६७ ते ८ हजार ६६७ रुपये असेल. तेलबियांमध्ये*

*भुईमुगासाठी ५ हजार ५१७ रुपये, सूर्यफुलासाठी ८ हजार ३४३, तिळासाठी १० हजार ३४६ रुपये प्रतिक्विंटल इतका एमएसपी दिला जाईल.*

*भारताच्या कोळसा आणि लिग्नाइट गॅसिफिकेशन उपक्रमाला गती देण्याच्या उद्देशाने कोळसा आणि लिग्नाइट गॅसिफिकेशन प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठीच्या योजनेलाही मंजुरी देण्यात आली. या योजनेसाठी ३७ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे. या योजनेविषयी अश्विनी वैष्णव म्हणाले..*

***होल्ड.. बाईट - अश्विनी वैष्णव***

*या योजनेमुळे देशात कोळशाची विपुलता असलेल्या भागात सुमारे ५० हजार रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.*

*नागपूर इथल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचं सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या माध्यमातून आधुनिकीकरण करायलाही आजच्या बैठकीत मंजुरी मिळाली. यासाठी मिहानला देण्यात आलेली लीज २०३९ पर्यंत वाढवण्यात आली आहे. जीएमआर ३० वर्षांसाठी हे विमानतळाचं संचालन करणार आहे.)*

**<><><><><><>**

केंद्र सरकारनं सोन्या चांदीवरचं आयात शुल्क ६ टक्क्यांवरुन १५ टक्के केलं आहे. प्लॅटिनमवर १५ पूर्णांक ४ दशांश टक्के आणि सोन्याची नाणी आणि इतर घटकांवरच्या आयात शुल्कातही वाढ करण्यात आली आहे.

या करवाढीमुळं सोनं आज तोळ्यामागे ९ हजार १२० रुपयांनी महाग झालं तर चांदीचे दर किलोमागे २२ हजार ८५३ रुपयांनी वाढले. त्यामुळं एक तोळा २२ कॅरेट सोनं सुमारे १ लाख ६२ हजार रुपयांना तर एक किलो चांदी २ लाख ९६ हजार रुपयांना मिळत होती.

करवाढीमुळं सोन्याच्या किंमतींमध्ये तोळ्यामागे २७ हजार रुपयांनी वाढ होईल आणि विक्रीवर याचा १०-१५ टक्के परिणाम होईल, असं अखिल भारतीय जेम्स आणि ज्वेलरी परिषदेचे अध्यक्ष राजेश रोकडे म्हणाले.

**<><><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धपरिस्थितीमुळे निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इंधनाचा वापर नियंत्रित करण्याचं आवाहन केलं होतं, त्या आवाहनानुसार प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या देशांतर्गत दौऱ्यांसाठीच्या ताफ्यात कपात केली आहे. विशेष सुरक्षा दलाच्या कार्यपद्धती नुसार

ताफ्यातली अत्यावश्यक सुरक्षा अबाधित ठेवण्यात आली असून सुरक्षा दलातली अवांतर वाहनं कमी करण्यात आली आहेत. गृहमंत्री अमित शहा यांनी देखील त्यांचा सुरक्षा यंत्रणेचा ताफा निम्म्याहुन अधिक कमी केला आहे.

**<><><><><><>**

राज्यातले मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यावर राज्य सरकारनं निर्बंध लादले आहेत. मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्याही सरकारनं अर्धी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या आढावा बैठकीत हे निर्णय झाले. राज्यपालांनीही गृह विभागाला विद्यमान सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेऊन त्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्याची शक्यता तपासण्याचे निर्देश दिले आहेत.

इंधन आणि परकीय चलन बचतीच्या अनुषंगाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून सरकारनं हे निर्णय घेतले आहेत. अत्यावश्यक वगळता इतर दौऱ्यासाठी विमान किंवा हेलिकॉप्टर ऐवजी नियमित विमानसेवेचा वापर करण्याचे निर्देशही सरकारनं दिले आहेत. तसंच सध्या आठवड्यातून किमान १ दिवस सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याचं आवाहन मंत्री आणि अधिकाऱ्यांना करण्यात आलं आहे. दूरदृश्य प्रणालीच्या सहाय्याने बैठका, वीज बचतीसाठी अनावश्यक होर्डिंगवर कारवाई करावी असंही सरकारनं म्हटलं आहे.

इतर राज्यातल्या मुख्यमंत्री आणि मंत्र्यांनीही अशाच प्रकारचे उपाय योजले आहेत.

एअर इंडियानं काही आंतरराष्ट्रीय उड्डाणं कमी करायचं ठरवलं आहे. इंधनदरात झालेली वाढ आणि हवाई क्षेत्रबंदी यामुळे हा निर्णय घेतल्याचं एअर इंडियानं म्हटलं आहे.

**<><><><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं आज बारावीच्या परीक्षेचे निकाल जाहीर केले. त्यात ८५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी पास झाले असले तरी गेल्यावर्षीच्या तुलनेत निकालात घट झाली आहे. मुलींमध्ये पास होण्याचे प्रमाण ८८ टक्के तर मुलांमध्ये हे प्रमाण ८२ टक्के आहे. यंदा १७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना ९५ टक्के पेक्षा जास्त तर ९४ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना ९० टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळाले आहेत.

**<><><><><>**

नीट पेपर फुटी प्रकरणी सीबीआयनं आत्तापर्यंत जयपूरमधून ३, गुरुग्राम, नाशिक आणि अहिल्यानगरमधून प्रत्येकी एक अशा ६ आरोपींना अटक केली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या राहुरी तालुक्यातल्या धनंजय लोखंडे याला सीबीआयनं आज अटक केली. ट्रान्झिट रिमांड मिळाल्यानंतर त्याला दिल्लीला नेण्यात येईल. सकाळी ११ पासून ६ वाजेपर्यंत त्याच्यासह इतर दोघांची चौकशी झाली. पण इतरांना सीबीआयनं चौकशीनंतर सोडून दिलं. या प्रकरणात नाशिकमधून अटक केलेला शुभम खैरनार यालाही न्यायालयानं ट्रान्झिट रिमांड मंजूर केला आहे. त्याच्या भावालादेखील आज नांदगाव इथून ताब्यात घेण्यात आलं .

पुणे पोलिसांनी पुण्यातल्या बिबवेवाडी परिसरातून एका महिलेला ताब्यात घेतलं आहे. प्राथमिक चौकशीनंतर त्या महिलेला सीबीआयच्या ताब्यात देण्यात आलं आहे.

**<><><><><>**

पुद्दुचेरीत ऑल इंडिया एनआर कॉँग्रेस नेते एन. रंगासामी यांनी आज मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. पुद्दुचेरीचे राज्यपाल के. कैलाशनाथन यांनी, पुद्दुचेरीच्या लोकनिवासमध्ये रंगासामी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. कॉँग्रेसचे

मलाडीकृष्ण राव आणि भाजपाचे एन नमस्स्सि-वायम यांनीही यावेळी मंत्रीपदाची शपथ घेतली. रंगासामी यांची पाचव्यांदा मुख्यमंत्री म्हणून निवड झाली आहे.

**<><><><><><>**

तामिळनाडू विधानसभेत मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी विश्वासदर्शक ठराव जिंकला आहे. जोसेफ विजय यांच्या टीव्हीके म्हणजेच तमिळगा वेत्री कळघम पक्षाने मांडलेल्या विश्वासदर्शक ठरावाला त्यांच्या मित्रपक्षाबरोबरच अण्णा द्रमुकच्या एका गटाने आणि अम्मा मक्कल मुन्नेत्र कळघममधून निलंबित केलेले आमदार एस. कामराज यांनी पाठिंबा दिला. ठरावाला १४४ आमदारांनी पाठिंबा दिला, २२ जणांनी विरोधात मत दिलं तर ५ जण तटस्थ राहिले. द्रमुकच्या आमदारांनी सभात्याग केला. तामिळनाडू विधानसभेत ११८ जणांचं पाठबळ आवश्यक असताना आता टीव्हीकेकडे १४४ जणांचं बहुमत आहे.

**<><><><><><>**

चीनमध्ये उद्यापासून सुरु होणाऱ्या परिषदेसाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यासोबत अनेक व्यावसायिक तसंच तंत्रज्ञान व्यवस्थापकांचं शिष्टमंडळ चीन दौऱ्यावर पोहोचलं. ट्रंप आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यात इराण युद्ध, व्यापार, कृत्रिम बुद्धीमत्ता अशा अनेक बाबींवर चर्चा होणार आहे.

**//<><><><><><>//**